**स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षणातील लाभार्थ्यांना
भौतिक आमिषे व प्रलोभने न देण्याबाबत..**

**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**२८, क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ, पुणे - ४११००१**
E-mail: cevt1.trti@gmail.com
Website: trti.maharashtra.gov.in
दुरध्वनी - ०२०-२६३३०८५४

---

जा.क्र./आसंप्रसं/२०२४-२५/स्पर्धा परीक्षा/का.०४/ ४८७९ दि.१४/१० /२०२५

वाचा :-

१. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. सान्यावि-२०२३/प्र.क्र.६०(४)/बांधकामे, दि. ३० ऑक्टोबर, २०२३
२. दि.३१/०१/२०२४ रोजी मा.अपर मुख्य सचिव (वित्त), महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीचे इतिवृत्त.

**परिपत्रक :**

महाराष्ट्र राज्यातील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (टीआरटीआय), पुणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे, छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी), पुणे व महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर व तत्सम संस्थांच्या विविध योजनांमध्ये सर्वंकष धोरण निश्चित करणेबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. सदर शासन निर्णयाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मा.अपर मुख्य सचिव (वित्त), महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली दि.३१/०१/२०२४ रोजी बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमांची अंमलबजावणी व सनियंत्रण करण्यासाठी आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांच्या अध्यक्षतेखाली सर्व स्वायत्त संस्थांच्या प्रमुखांचा समावेश असलेली समिती गठीत करण्यात आली आहे. सदरच्या गठीत समितीद्वारे सर्वंकष धोरणाच्या अनुषंगाने राबविण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमांच्या अंमलबजावणी करीता खाजगी प्रशिक्षण संस्थांना नामिकाप्रविष्ट (Empanel) केले आहे.

सन २०२५-२६ विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरीता टीआरटीआय, बार्टी, आर्टी, सारथी व महाज्योती या संस्थांच्या लक्षित गटातील उमेदवारांकडून ऑनलाईन स्वरुपात अर्ज मागविण्यात आले होते व त्याआधारे लाभार्थी निवडीकरीता सामायिक चाळणी परीक्षा (CET) घेण्याची प्रक्रिया सुरु आहे. सामायिक चाळणी परीक्षेच्या अंती निवड झालेल्या उमेदवारांना त्यांच्या इच्छेनुसार पूर्व प्रशिक्षण योजनानिहाय नामिकाप्रविष्ट (Empanel) केलेल्या प्रशिक्षण संस्था निवडीकरीता पसंतीक्रम देण्याची मुभा आहे. सबब, प्रशिक्षण संस्थांकडून विद्यार्थ्यांना आकर्षित करण्याकरीता सदर योजनांमध्ये अंतर्भूत नसणाऱ्या बाबी जसे की, **टॅब्लेट देणे, आर्थिक लाभाचे प्रलोभन देणे, प्रशिक्षण कालावधी मध्ये विविध सवलती देणे,** इत्यादी स्वरूपाची आमिषे तसेच शासकीय संस्थांची नावे व अधिकृत संस्थाचिन्ह (Logo) वापरून सामाजिक माध्यमांद्वारे (Social media) विद्यार्थ्यांची दिशाभूल करणाऱ्या जाहिराती

प्रसारित केल्याचे आढळल्यास याद्वारे प्रशिक्षण संस्थाना असे निर्देश देण्यात येते की, योजनांच्या प्रक्रियेचे उल्लंघन करणारी माहिती व कोणत्याही स्वरुपात विद्यार्थ्यांना भौतिक आमिषे (**टॅब्लेट देणे, आर्थिक लाभाचे प्रलोभन देणे, प्रशिक्षण कालावधी मध्ये विविध सवलती देणे, इत्यादी**) व प्रलोभने दिल्यास संबंधित प्रशिक्षण संस्थेवर योग्य ती कार्यवाही करून अशा प्रशिक्षण संस्थाना काळ्या यादीत टाकण्यात येईल, याची सर्व प्रशिक्षण संस्थांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

14/10/25

(दिपा मुधोळ-मुंडे, भा.प्र.से.)
**अध्यक्ष, स्प.प.प्र.अं व सं.समिती तथा**
**आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था**

**प्रत :**

१. महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे
२. व्यवस्थापकीय संचालक, आण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई
३. व्यवस्थापकीय संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी), पुणे